आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३ वाजता
१७ फेब्रुवारी २०२५ सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- MSME साठी तारणमुक्त कर्ज देणाऱ्या योजनेला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते सुरुवात, बँक गैरव्यवहारात पैसे अडकलेल्यांना वीम्याअंतर्गत अधिक रक्कम देण्याचा प्रस्ताव
- दिल्ली आणि बिहारमधे भूकंपाचे धक्के, सुरक्षेच्या उपाययोजनांचं पालन करण्याचं प्रधानमंत्र्यांचं नागरिकांना आवाहन
- राज्यात चालू साखर हंगामात सुमारे ६१ लाख टन साखरेचं उत्पादन
- अमेरिकेतून पाठवणी करण्यात आलेल्या ११२ भारतीयांचं विमान अमृतसरमधे दाखल

**आणि**

- इस्रोकडून सॉलिड रॉकेट मोटर्ससाठी जगातला सर्वात मोठा दहा टन
- वजनाचा प्रोपेलेंट मिक्सर विकसित

**<><><><><>**

बँकांमधल्या गैरव्यवहारांमुळे खात्यात पैसे अडकून पडलेल्या खातेदारांना अधिक रक्कम देण्याचा सरकारचा विचार आहे. सध्या DICGC मार्फत ५ लाखापर्यंतच्या ठेवी परत मिळतात. ही रक्कम १० लाखापर्यंत वाढवण्याचा सरकारचा विचार असल्याचं वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम. नागाराजू

यांनी आज मुंबईत सांगितलं. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतल्या घोटाळ्याच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते.

वीमा धारकांना योजना आवडली नाही पहिल्या वर्षी ती परत करता येईल. त्यानंतर त्यांना संपूर्ण वीमा हप्ता परत मिळेल, अशी योजना सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली. गेल्या काही दिवसात देशातल्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात घसरण सुरू आहे. परदेशी गुंतवणूक दार पैसे काढून घेत असल्यानं ही घसरण सुरू आहे. यासंदर्भात अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या, देशातल्या बाजारपेठांमधून गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळत असल्यानं गुंतवणूकदार पैसे काढून घेत आहे. जागतिक पातळीवर अस्थिरता निर्माण झाल्यावर हे प्रकार होतात, असं वित्त सचिव तुहीन कांत पांडे म्हणाले.

**<><><><><>**

सक्ष्म लघू आणि मध्यम उद्योगांना म्युच्युअल क्रेडिट गॅरंटी योजनेअंतर्गत मशिनरी किंवा उपकरणे खरेदी करण्यासाठी तारणमुक्त १०० कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज दिलं जाणार असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज मुंबईत अर्थसंकल्पानंतर भागधारकांसोबत अर्थसंकल्पानंतरच्या बैठकीत बोलत होत्या.

अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या सूक्ष्म लघू आणि मध्यम उद्योगांसाठी जाहीर केलेल्या म्युच्युअल क्रेडिट गॅरंटी योजनेची सुरुवात त्यांनी केली. यावेळी त्यांनी या योजनेअंतर्गत पात्र असलेल्या उद्योगांना मंजुरी पत्रांचं वितरण केलं.

स्वामी निधीचा लाभ घेतलेल्या घर खरेदीदारांना यावेळी अर्थमंत्र्यांनी घरांच्या चाव्या सुपूर्द केल्या.

कोविडनंतर सार्वजनिक खर्चासाठी भांडवल उभारणीसाठी पैसे गुंतवण्यावर सरकारचा भर असून गेल्या वर्षीच्या तुलनेत यावेळी अर्थसंकल्पात दाखवलेला भांडवली खर्च किमान १० पूर्णांक २ टक्क्यांपेक्षा  जास्त असल्याचं त्यांनी म्हटलं. तसंच क्रिटिकल मिनरल्सच्या क्षेत्रात महत्वाचे सामंजस्य करार केले जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं. या अर्थसंकल्पात तंत्रज्ञान, ऊर्जा आणि नवोन्मेष यावर विशेष लक्ष दिलं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राजधानी नवी दिल्लीत आज पहाटे पाच वाजून ३६ मिनिटांनी भूकंपाचे झटके बसले. त्याची तीव्रता ४ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू दिल्लीजवळ धौल कुवा इथं जमिनीच्या खाली पाच किलोमीटरवर होता. यात जीवित अथवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही.

भूकंपानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करत नागरिकांना शांतता बाळगण्याचं, सुरक्षेच्या उपायोजनांचं पालन करत सर्तक राहण्याचं आवाहन केलं आहे. प्रशासकीय यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. दरम्यान, दिल्ली पोलिसांनीही नागरिकांना सावधगिरी बाळगत सतर्क राहण्याचं आवाहन केलं

आहे. तसंच आणिबाणीची परिस्थिती उद्भवल्यास ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असं सांगितलं आहे.

दरम्यान, **बिहार**च्या सिवान आणि आसपासच्या जिल्ह्यातही आज सकाळी भूकंपाचे धक्के बसले. आज सकाळी आठ वाजून दोन मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले असून भूकंप मापकावर त्याची तीव्रता ४ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू सिवानपासून १० किलो मीटर अंतरावर असल्याची माहिती पटणा इथल्या भारतीय हवामान विज्ञान विभागानं दिली.

**<><><><><>**

जागतिक पटलावर देशाचे, विशेषतः महाराष्ट्रातले खेळाडू आपले नाव कमावत आहेत, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. जळगाव जिल्ह्यात जामनेर इथं आयोजित नमो कुस्ती महाकुंभ-२ अंतर्गत देवाभाऊ केसरी आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेचं उद्घाटन करताना ते आज बोलत होते. ऑलम्पिक स्पर्धा, कॉमनवेल्थ, एशियन गेम अशा विविध स्पर्धांमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी चांगली कामगिरी केली आहे, असंही ते म्हणाले. या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत भारतासह फ्रान्स, रोमानिया इस्टोनिया, उझबेकिस्तान, जॉर्जिया या देशातल्या विजेत्या खेळाडूंनी सहभाग घेतला आहे.

**<><><><><>**

शिवभोजन योजना असो लाडकी बहीण योजना किंवा शेतकऱ्यांची वीज बिल माफी योजना कुठलीही योजना सरकार बंद करणार नसल्याचा पुनरुच्चार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केला. नागपूर इथं ते बातमीदारांशी बोलत होते. काही योजनांचा लोकांनी गैरफायदा घेतला, त्याची तपासणी सुरू आहे. योजनांना पात्र असलेल्यांना लाभ निश्चित मिळेल असं बावनकुळे यांनी सांगितलं.

सुप्रीम कोर्टामध्ये ओबीसी आरक्षणासंदर्भात ज्याच्या बाबी होत्या, त्याचं उत्तर सरकारनं दिलं आहे, लवकरच निकाल लागेल आणि राज्य सरकार तातडीनं स्थानिक निवडणुका घेईल, अशी अपेक्षा ही बावनकुळे यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

राज्यातला साखर हंगाम आता अखेरच्या टप्प्यात आला आहे. आतापर्यंत सुमारे ६१ लाख टन साखरेचं उत्पादन झालं असून, १४ कारखान्यांनी आपली धुराडी बंद केली आहेत. सर्वाधिक १७ लाख टन साखर उत्पादन कोल्हापूर विभागात झालं; तर पुणे विभागात १४ लाख टन साखर उत्पादित करण्यात आली. यंदा राज्यात ८५ लाख टन साखर उत्पादनाचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता; मात्र विविध कारणामुळे साखर उत्पादन अंदाजापेक्षा कमी होईल, तसंच यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत साखर गाळप हंगाम लवकर संपेल, असं साखर आयुक्तालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

मित्र राष्ट्रांच्या प्रशिक्षणार्थींसाठी 'MRCC OPS आणि SAR' या आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाचं उद्घाटन आज तटरक्षक दलाच्या पश्चिम सीमेचे कमांडर भीष्म शर्मा यांच्या हस्ते मुंबईत झालं. हा अभ्यासक्रम तटरक्षक दल पश्चिम विभाग आणि सागरी सुरक्षा समन्वय केंद्राद्वारे दरवर्षी आयोजित केला जातो. मित्र राष्ट्रांमधले संबंध वाढवणं, सागरी सुरक्षेत बचावाचं नियोजन आणि समन्वय यांचं प्रशिक्षण देणं यांचा या अभ्यासक्रमात समावेश आहे. यंदा या अभ्यासक्रमात बांगलादेश, मालदीव, म्यानमार, ओमान, सेशेल्स आणि श्रीलंका या देशातले २२ स्पर्धक सहभागी झाले आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेत कथितरित्या अवैध पद्धतीने गेलेल्या ११२ भारतीयांना घेऊन आलेलं विमान अमृतसर इथल्या विमानतळावर काल रात्री उशीरा उतरलं. भारतीयांची अमेरिकेतून पाठवणी करणारं हे तिसरं विमान आहे. यातले ४४ नागरिक हरियाणामधले, ३३ गुजरातमधले, ३१ पंजाब, २ उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातले प्रत्येकी एक जण आहे. या प्रवाशांची औपचारिक तपासणी झाल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात येईल.

**<><><><>**

भारतानं सॉलिड रॉकेट मोटर्ससाठी जगातला सर्वात मोठा दहा टन वजनाचा प्रोपेलेंट मिक्सर विकसित केला आहे. हे तंत्रज्ञान भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या सतीश धवन अंतराळ केंद्रानं, बंगळुरू इथल्या केंद्रीय उत्पादन तंत्रज्ञान संस्थेच्या सहकार्यानं विकसित केलं आहे. या मिक्सरचे वजन १५०

टन आहे. या मिक्सरमुळे रॉकेट प्रक्षेपणासाठी आवश्यक असलेल्या सॉलिड प्रोपेलेंट घटकांचे अचूक आणि सुरक्षित मिश्रण सुनिश्चित होते. हे तंत्रज्ञान अंतराळ तंत्रज्ञानात भारताच्या वाढत्या स्वावलंबनाचं प्रतीक आहे, असं इस्रोने म्हटले आहे.

<><><><><>

दिल्लीचा मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळ जाहीर करण्यात झालेल्या विलंबाबद्दल आम आदमी पक्षाने भाजपवर टीका केली आहे. दिल्लीचा कारभार चालवण्यासाठी भाजपाकडे विश्वासार्ह नेत्याचा अभाव असल्याचा आरोप ज्येष्ठ आप नेत्या आणि दिल्लीच्या हंगामी मुख्यमंत्री आतिशी केला आहे. त्या आज दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होत्या. भाजपाकडे प्रशासनासाठी कोणताही दृष्टिकोन किंवा योजना नसल्याचं आतिशी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

प्रार्थना स्थळे अधिनियम, १९९१ कायद्याला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका दाखल होत असल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं आज तीव्र नाराजी व्यक्त करत यासंदर्भातली सुनावणी पुढे ढकलली. इंदिरा जयसिंह यांनी दाखल केलेल्या याचिकेवरच्या सुनावणीवेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या पीठानं या संदर्भात आणखी याचिका दाखल झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

या संदर्भात दाखल झालेल्या याचिकांची संख्या पाहता तात्काळ सुनावणी घेणं शक्य नाही. काही याचिकांची सुनावणी तीन  न्यायाधीशांच्या पीठासमोर झाली असून त्यावर पुन्हा सुनावणी घेणं शक्य नसल्याचं सरन्यायाधीशांनी यावेळी सांगितलं.

**//<><><><><>//**